क्रमांक : का.स./बैठक/२११

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २८ एप्रिल, २००५.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २४ मार्च, २००५ (गुरुवार) रोजी झालेल्या २११ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

२८.४.२००५

सचिव,
कार्यकारी समिती

**प्रति :**

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - अध्यक्ष

श्री.द.म.सुकथनकर,
"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०१८. - सदस्य

श्री.र.य.तांबे,
ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,
सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,
नागपूर - ४४० ०१५. - सदस्य

श्री. हरि शंकरन्,
कार्यकारी संचालक - इन्फ्रास्ट्रक्चर,
इन्फ्रास्ट्रक्चर लिजिंग अँड फिनान्सिअल सर्व्हिसेस लिमिटेड,
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१. - सदस्य

प्रधान सचिव (१),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

...२/-

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२३.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

निमंत्रित :
प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (पर्यावरण),
उर्जा व पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
## कार्यकारी समितीच्या २११ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २४ मार्च, २००५ (गुरुवार) |
| वेळ | : | सकाळी ११.३० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.रा.मे.प्रेमकुमार<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.र.य.तांबे | - | सदस्य |
| श्री.एन.रामाराव<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री.अशोक सिन्हा<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |
| डॉ.सुरेश जोशी<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

**निमंत्रित :**

डॉ.टी. चंद्र शेखर
अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक

श्री.के.आर.चौधरी
संचालक (अभियांत्रिकी सेवा),
बृहन्मुंबई महानगरपालिका
(महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे प्रतिनिधी म्हणून)

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्तीय सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.वि.देशिंगकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.यु.व्ही.लुकतुके
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

कु.उमा अड्सुमली
प्रमुख, नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.के.रा.घोरपडे
प्रमुख (पुनर्वसन व पुनर्वसाहत),
मुंबई नागरी परिवहन प्रकल्प,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.प्र.ह.राऊत
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.रा.वानखडे
कर्मचारीवर्ग अधिकारी,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २४ डिसेंबर, २००४ रोजी झालेल्या २१० व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ :** **प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २४ डिसेंबर, २००४ रोजी झालेल्या २१० व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ :** **सी.एस.टी.रस्ता व वांद्रे-कुर्ला संकुल यांना जोडणा-या रस्त्याचे रुंदीकरण व मजबुतीकरणाच्या कामासाठीच्या लघुत्तम निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

**३.१** **या प्रस्तावाबाबत माहिती** देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने वांद्रे-कुर्ला संकुलात पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे ही प्राधिकरणाची जबाबदारी आहे. वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये अनेक संस्थांची कार्यालये आहेत तसेच प्रदर्शने / विविध कार्यक्रम यासाठी संकुलातील मैदाने भाडयाने देण्यात येतात. यामुळे वांद्रे-कुर्ला संकुलातील वाहतुकीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. या संकुलाला वांद्रे व कुर्ला या दोन्ही उपनगरांकडून प्रवेशमार्ग आहेत. त्यातील वांद्रेकडील प्रवेशमार्गाचा विकास झाला असून कुर्ल्याकडील प्रवेशमार्ग विकसित करण्याची आवश्यकता असल्यामुळे सी.एस.टी.मार्ग ते वांद्रे-कुर्ला संकुल या १.३ कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या रुंदीकरणाचे व मजबुतीकरणाचे काम हाती घेणे आवश्यक आहे. सदर काम मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातील प्राधान्य क्र.-१ मध्ये अंतर्भूत आहे. या कामाचा अंदाजित खर्च सुमारे रु.२,०८,०५,३८४/- इतका आहे. या कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. एकंदर १२ इच्छुक ठेकेदारांनी सदर कामाच्या निविदा विकत घेतल्या. मात्र त्यापैकी फक्त २ ठेकेदारांनी निविदा सादर केल्या. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, मे.राजेश कंस्ट्रक्शन कंपनी हे प्रथम लघुत्तम निविदाकार असून त्यांचा देकार अंदाजित खर्चापेक्षा ९% जास्त इतका आहे. हा देकार अंदाजित खर्चापेक्षा जास्त असल्याने मे.राजेश कंस्ट्रक्शन कंपनी यांच्याशी वाटाघाटी केल्या असता त्यांनी दर कमी करण्यास असमर्थता दर्शविली. म्हणून मे.रिलायन्स कंस्ट्रक्शन कंपनी या द्वितीय लघुत्तम निविदाकाराबरोबर वाटाघाटी केल्या असता त्यांनी अंदाजित खर्चाइतक्या दराने काम करण्यास संमती दर्शविली. त्यानंतर मे.राजेश कंस्ट्रक्शन कंपनी यांनीही अंदाजित खर्चाइतक्या दराने काम करण्यास संमती दर्शविली. त्यामुळे दोन्ही निविदाकारांना रिडयूस्ड ऑफर देण्यास सांगितले. त्यानुसार मे.राजेश कंस्ट्रक्शन कंपनी यांनी देकार दिला. मात्र मे.रिलायन्स कंस्ट्रक्शन कंपनी यांनी देकार दिला नाही. रिडयूस्ड ऑफरनुसार मे.राजेश कंस्ट्रक्शन कंपनी यांनी अंदाजित खर्चापेक्षा ०.२१ % इतक्या कमी

दराने काम करण्यास दिलेला देकार हा लघुत्तम असल्याने त्यांच्या देकारास मंजूरी देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

३.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९५२</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे सी.एस.टी. रस्ता व वांद्रे-कुर्ला संकुल यांना जोडणा-या रस्त्याच्या रुंदीकरणाच्या व मजबुतीकरणाच्या कामासाठी मे.राजेश कंस्ट्रक्शन कंपनी यांचा रिडयूस्ड ऑफरप्रमाणे असलेला रु.२,०७,६१,६९२/६९ (रुपये दोन कोटी सात लाख एकसष्ट हजार सहाशे ब्याण्णव व पैसे एकोणसत्तर मात्र) एवढया रकमेचा लघुत्तम देकार स्वीकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे. सदर कामासाठीचा खर्च हा मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातील प्राधान्य क्रमांक - १ साठी मंजूर केलेल्या निधीतून करणे आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र.४</u> : <u>वांद्रे-कुर्ला जोडरस्ता व इतर अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरणाच्या कामासाठीच्या लघुत्तम निविदेस मंजूरी.</u>

४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलातील विविध कार्यालयांसाठी योग्य दर्जाच्या रस्त्याची आवश्यकता आहे तसेच या संकुलातील भूखंडाच्या विक्रीस चांगला प्रतिसाद मिळावा याद्दृष्टीने वांद्रे-कुर्ला संकुलातील ४५ मी.रुंदीचा मुख्य रस्ता

तसेच इतर अंतर्गत रस्ते यांचा पृष्ठभाग सुधारण्यासाठी डांबरीकरणाचे काम हाती घेणे आवश्यक आहे. वांद्रे-कुर्ला संकुलात मुख्य रस्ता व इतर अंतर्गत रस्ते मिळून एकूण १५,९८८ मीटर लांबीचे रस्ते असून त्यांचे क्षेत्रफळ ४,२७,५२२ चौ.मी. इतके आहे. सदर रस्त्यांची कामे सन १९९६ साली पूर्ण झाली असून मुख्य रस्त्याचे नूतनीकरण सन २००० मध्ये पूर्ण करण्यात आले. प्रस्तावीत डांबरीकरणाचे काम हे एकूण १,९६,००० चौ.मी. इतक्या क्षेत्रफळासाठी असून ते १२ महिन्यात, जेथे गरज असेल त्याप्रमाणे, करावयाचे आहे. या कामाचा अंदाजित खर्च सुमारे रु.२,४८,०८,८०२/- इतका आहे. या कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. एकूण ९ इच्छुक ठेकेदारांनी सदर कामाच्या निविदा विकत घेतल्या. त्यापैकी ८ ठेकेदारांनी निविदा सादर केल्या. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, मे.व्ही.एल.के.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचा देकार कामाच्या अंदाजित खर्चापेक्षा १८.९९% कमी इतका आहे. सदर लघुत्तम निविदाकारानी यापूर्वी प्राधिकरणाचे डांबरीकरणाचे काम चांगल्याप्रकारे पूर्ण केले आहे. तसेच सदर निविदाकाराचा देकार अंदाजित खर्चाच्या १५% पेक्षा कमी असल्यामुळे निविदा शर्तीनुसार त्यांच्याकडून दुप्पट सुरक्षा रक्कम घेण्यात येणार आहे. या कामाचा खर्च प्राधिकरणाच्या निधीतून करावयाचा आहे. मे.व्ही.एल.के.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचा लघुत्तम देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा असल्याने या देकारास मंजूरी देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

४.२ श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे निदर्शनास आणून दिले की, बंगलोर शहरामध्ये रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामासाठी डांबरामध्ये प्लॅस्टीक पिशव्यांची भर घालण्यात आली व त्यामुळे डांबरीकरणाचे काम अधिक भक्कम झाले. तसेच सेंट्रल रोड रिसर्च इन्स्टिट्यूट (CRRI) या संस्थेने या तंत्रज्ञानाचा वापर करण्याची शिफारस केली आहे. म्हणून या तंत्रज्ञानाचा उपयोग मुंबईतील रस्त्याच्या डांबरीकरणासाठी करण्यात यावा. या सूचनेस कार्यकारी समितीने मान्यता दिली.

४.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९५३</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत

होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वांद्रे-कुर्ला जोडरस्ता तसेच इतर अंतर्गत रस्त्यांच्या डांबरीकरणाच्या कामासाठी मे.व्ही.एल.के.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचा रु.२,००,९७,६१०/५० (रुपये दोन कोटी सत्याण्णव हजार सहाशे दहा व पैसे पन्नास मात्र) एवढया रकमेच्या सर्वात लघुत्तम सुसंवादी देकार स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गतच्या ना.सी.फडके मार्गाची, पश्चिम द्रुतगती मार्ग ते गोखले पुलापर्यंत साईवाडी चौकावरील पुलाचे बांधकामासह सुधारणा तसेच अस्तित्वात नसलेल्या रस्त्याचे टिपू सुलतान चौक ते संत नामदेव चौक पर्यंत बांधकामाच्या निविदेला मंजूरी देणेबाबत.**

५.१ या बाब टिप्पणीची पार्श्वभूमी विशद करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदरील काम हे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या प्राधान्यक्रमांक-१ अंतर्गतच्या कामापैकी आहे. या कामाची अंदाजित किंमत सुमारे रु.२४.४८ कोटी आहे. या कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. त्यास प्रतिसाद म्हणून प्राप्त ४ निविदांपैकी मे.पी.बी.ए.इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी यांची निविदा कामाच्या अंदाजित खर्चापेक्षा ३.९९% कमी दराची असून कार्यकारी समितीच्या मंजूरीसाठी त्याची शिफारस करण्यात येत आहे.

५.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९५४ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि

याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ना.सी.फडके मार्गाची, पश्चिम द्रुतगती मार्ग ते गोखले पूलापर्यंत साईवाडी चौकावरील पूलाच्या बांधकामासह सुधारणा तसेच अस्तित्वात नसलेल्या रस्त्याचे टिपू सुलतान चौक ते संत नामदेव चौक पर्यंत बांधकामाच्या कामासाठी मे.पी.बी.ए.इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी यांचा रु.२३.५० कोटी (रुपये तेवीस कोटी पन्नास लाख मात्र) एवढया रकमेचा सर्वात लघुत्तम देकार स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे. सदर कामासाठीचा खर्च हा मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातील प्राधान्य क्रमांक - १ साठी मंजूर केलेल्या निधीतून करणे आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र.६</u> : <u>मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गतच्या एस.व्ही.रोड गोरेगांव-मुलुंड रोड जंक्शन ते सांताक्रुझ विकास कामाच्या फेरनिविदेला मंजूरी देणेबाबत.</u>

६.१ या बाब टिप्पणीची पार्श्वभूमी विशद करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, पश्चिम उपनगरातील स्वामी विवेकानंद रस्त्याच्या (S.V.Road) भाग-२ च्या म्हणजे सांताक्रुझ ते गोरेगांव या भागाच्या सुधारणेच्या कामासाठी पहिल्या दोन निविदा सूचनांना मिळालेल्या प्रतिसादानुसार निविदा चढया दराच्या असल्यामुळे तिस-यांदा फेरनिविदा मागविण्यात आली. या कामाचा अंदाजित खर्च सुमारे रु.३३.०० कोटी इतका आहे. निविदा सूचनेस प्रतिसाद म्हणून एकूण १४ को-या निविदा विकण्यात आल्या व ५ निविदा दिलेल्या दिनांकास प्राप्त झाल्या. यापैकी मे. अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा ही लघुत्तम असून मंजूरीसाठी त्याची शिफारस करण्यात येत आहे. या रस्त्याच्या सुधारणेअंतर्गत रस्त्याची रुंदी सुमारे २७ मीटर इतकी वाढविण्यात येणार आहे.

६.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९५५ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत स्वामी विवेकानंद रस्त्याच्या सांताक्रुझ ते गोरेगांव या भागातील रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामासाठी मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचा रु.३३/- कोटी (रुपये तेहेतीस कोटी मात्र) इतका अंदाजपत्रकीय खर्चाइतक्या रकमेचा लघुत्तम देकार स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे. सदर कामासाठीचा खर्च हा मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातील प्राधान्य क्रमांक - १ साठी मंजूर केलेल्या निधीतून करणे आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ :** **मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत (पर्याय-ब) मेसर्स एस.व्ही.पटेल / बी.बी.पटेल / लार्सन अँड टुब्रो लि. (भागीदार संस्था) यांच्यामार्फत मौजे मानखुर्द येथे सुरु असलेल्या सदनिका बांधकामाच्या कंत्राटांतर्गत वाढीव कामास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

७.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पामुळे बाधित होणा-या कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या धोरणानुसार प्रत्येक प्रकल्पबाधित कुटुंबाला २२५ चौ.फूट क्षेत्रफळाची कायमस्वरुपी सदनिका विनामूल्य उपलब्ध करुन द्यावयाची आहे. पुनर्वसनासाठी सदनिका उपलब्ध करुन घेण्यास अवलंबिलेल्या पर्यायांपैकी खाजगी विकासकांकडून हस्तांतरणीय विकास हक्क (टी.डी.आर.) अधिक रोख रक्कमेच्या

बदल्यात सदनिका बांधून जमिनीसह संपादन करणे या पर्यायांतर्गत मे.एस.व्ही.पटेल / मे.बी.बी.पटेल / लार्सन अँड टुब्रो (भागीदार संस्था) यांचेकडून ५,९१० सदनिका, हस्तांतरणीय विकास हक्क अधिक रोख रक्कम रु.१,३०,०००/- प्रति सदनिका या मोबदल्यात, संपादित करण्यास दिनांक १८ मार्च, २००२ रोजी झालेल्या १०२ व्या बैठकीत प्राधिकरणाने मंजूरी दिली होती. त्यानुसार ५९१० सदनिकांचे बांधकाम पूर्ण झाले असून सदर सदनिकांचे वितरण सध्या मानखुर्द, तुर्भे-मंडाले येथील संक्रमण शिबिरात राहणा-या तसेच सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यामुळे बाधित होणा-या कुटुंबांना करावयाचे आहे. सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याचे तपशीलवार सर्वेक्षण केले असता तेथे निवासी सदनिकांसमवेत मोठया संख्येने दुकाने तसेच व्यावसायिक बांधकामे असल्याचे आढळून आले. तथापि, प्रकल्पबाधितांसाठी ५९१० निवासी सदनिकांव्यतिरिक्त व्यावसायिक गाळे उपलब्ध नसल्यामुळे सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यामुळे बाधित दुकानांकरीता पर्यायी गाळे उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. या प्रकल्पाकरीता शासनाने संपादित केलेल्या जमिनीवर ५९१० सदनिका बांधल्यानंतरही काही मोकळी जागा उपलब्ध होती. तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नियमानुसार देय असलेल्या एकूण चटई क्षेत्रामधील काही चटई क्षेत्र शिल्लक होते. या सर्व बाबींचा विचार करुन विकासकांनी १७५ दुकाने व त्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नियमानुसार लागणारी शौचालये व सुविधा गाळे बांधण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला. यामध्ये २८ दुकाने अंदाजे १०० चौ.फूट व १४७ दुकाने अंदाजे २०० चौ.फूट क्षेत्रफळाची आहेत. दुकानांचे नकाशे तयार करताना जागतिक बँकेच्या नियमानुसार प्रकल्पबाधितांशी चर्चा केली असता प्रस्तावित दुकानांची उंची ९ फूटाऐवजी १३ फूट असावी अशी सूचना प्रकल्पबाधितांनी केली. त्यांच्या सध्याच्या व्यवसायाचे स्वरुप लक्षात घेता नकाशे मंजूर करताना दुकानांची उंची १३ फूट प्रस्तावित करण्यात आली. त्यानुसार विकासकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर करुन आवश्यक ती मंजूरी प्राप्त केली. विकासकाने प्रस्ताव देताना हस्तांतरणीय विकास हक्क अधिक रु.१,८८,००,०००/- इतक्या रोख रक्कमेची मागणी केली होती. प्राधिकरणाने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत सुमारे २५,००० सदनिका तसेच दुकाने फक्त हस्तांतरणीय विकास हक्काच्या बदल्यात संपादित केली आहेत. सदर दुकानांची उंची झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नियमानुसार ९ फूट इतकी आहे. या कारणास्तव विकासकाने दिलेल्या प्रस्तावावर चर्चा करुन असे ठरविण्यात आले की, हस्तांतरणीय विकास हक्क व दुकानांच्या वाढीव उंचीच्या (९ फूट ते १३ फूट) बांधकामाचा खर्च

विकासकास देणे योग्य होईल. वाढीव बांधकामाचा एकूण अंदाजित खर्च रु.४०,४४,७६६/- (सेवाकरासहीत) इतका आहे. ही वाढीव खर्चाची रक्कम मूळ कंत्राटाच्या तुलनेत अगदीच नगण्य म्हणजे ०.५% इतकी असल्यामुळे जागतिक बँकेच्या नियमानुसार या वाढीव खर्चास जागतिक बँकेची पूर्वमंजूरी घेणे आवश्यक नाही. सदर कंत्राटांतर्गत विकासकाने मौजे मानखुर्द येथे बांधलेल्या १७५ दुकानांच्या वाढीव कामाच्या मोबदल्यात त्यांस हस्तांतरणीय विकास हक्क व दुकानांच्या वाढीव उंचीमुळे आलेला खर्च रु.४०,४४,७६६/- (सेवाकरासहीत) देण्यास कार्योत्तर मान्यता देण्यासाठी प्रस्ताव आता कार्यकारी समितीस सादर केला आहे.

७.२ श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, हा वाढीव खर्च प्राधिकरणातर्फे करण्यात येऊन त्याची प्रतिपूर्ती जागतिक बँकेकडून कर्जरुपाने होईल.

७.३ त्यानंतर, प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९५६</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (दोन) व (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी परिवहन प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याकरीता मेसर्स एस.व्ही.पटेल / बी.बी.पटेल / लार्सन अँड टुब्रो लि. (भागीदार संस्था) यांच्यामार्फत मौजे मानखुर्द येथे सदनिका बांधकामाच्या कंत्राटांतर्गत वाढीव काम म्हणून एकूण १७५ दुकाने हस्तांतरणीय विकास हक्क व रोख रक्कम रु.४०,४४,७६६/- (रुपये चाळीस लाख चव्वेचाळीस हजार सातशे सहासष्ट मात्र) (सेवाकरासहीत) या मोबदल्यात विकत घेण्यास कार्योत्तर मंजूरी देत आहे."

**<u>बाब क्र.८ :</u>** **<u>वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मार्गावर सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्थेसाठी (MRTS) सखोल प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबत.</u>**

८.१ या बाब टिप्पणीबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई मेट्रो प्रकल्पासाठी दिल्ली मेट्रो रेल महामंडळाने (DMRC) तयार केलेल्या बृहत योजनेस प्राधिकरणाने मान्यता दिली आहे. बृहत योजनेच्या प्राधान्यक्रमांक-१ मधील अंधेरी-घाटकोपर या १० कि.मी. लांबीच्या मार्गाचा सखोल सुसाध्यता अहवाल यापूर्वीच तयार केला असून कुलाबा-माहिम-चारकोप, वर्सोवा-अंधेरी आणि माहिम-वांद्रे-कुर्ला संकुल-मानखुर्द या उर्वरीत ५४ कि.मी. लांबीच्या मार्गाचा सखोल प्रकल्प अहवाल दिल्ली मेट्रो रेल महामंडळामार्फत तयार करुन घेण्यात येत आहे. वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मार्गावर सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्थेची अंमलबजावणी सार्वजनिक-खाजगी सहभागाद्वारे (PPP) हाती घेण्याच्या प्रस्तावाला राज्य शासनाने मान्यता दिली असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची प्रकल्प अंमलबजावणी संस्था म्हणून नेमणूक केली आहे. त्यानुसार ऑगस्ट, २००४ मध्ये जागतिक निविदा मागविण्यात आल्या. अंधेरी-घाटकोपर मार्गावरील सार्वजनिक जलद वाहतूक प्रकल्पाचा प्रस्ताव भागभांडवलाच्या सहभागासाठी व निधी व्यवहार्यतेतील तफावतीकरीता केंद्र शासनाकडे जुलै, २००४ मध्ये सादर केला असता केंद्र शासनाने असे सुचविले की, अंधेरी-घाटकोपर मार्गासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात यावा. कुलाबा-माहिम-चारकोप, वर्सोवा-अंधेरी आणि माहिम-वांद्रे-कुर्ला संकुल-मानखुर्द मार्गासाठी सखोल प्रकल्प अहवाल दिल्ली मेट्रो रेल महामंडळ तयार करीत आहे म्हणून अंधेरी-घाटकोपर मार्गाचा प्रकल्प अहवाल तयार करण्याचे कामसुध्दा दिल्ली मेट्रो रेल महामंडळाला देण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे दिल्ली मेट्रो रेल महामंडळाकडून प्रस्ताव मागविण्यात आला. त्यानुसार रु.३५ लाख अधिक सेवाकर इतक्या खर्चासह अंधेरी-घाटकोपर मार्गाचा सखोल प्रकल्प अहवाल तयार करण्याचा प्रस्ताव दिल्ली मेट्रो रेल महामंडळाने सादर केला. इतर मार्गासाठी सखोल प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी १० कि.मी. लांबीच्या पट्टयासाठी रु.१० लाख प्रति कि.मी. या मूल्याऐवजी, रु.३.५ लाख प्रति कि.मी. हा दर दिल्ली मेट्रो रेल महामंडळाने प्रस्तावित केला. कामाचे महत्व व तातडीची निकड लक्षात घेता हे काम दिल्ली मेट्रो रेल महामंडळाला देण्यात आले व आता ही बाब कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहे. दिल्ली मेट्रो रेल महामंडळाने सदरहू सखोल प्रकल्प अहवाल तयार केला असून हा अहवाल केंद्र शासनाकडे

डिसेंबर, २००४ मध्ये सादर केल्यानंतर त्या अहवालास तत्वतः मान्यता मिळविण्यासाठी केंद्र शासनाने सदर अभ्यासाची नियोजन आयोगाकडे शिफारस केलेली आहे. तसेच भारत सरकारच्या नगर विकास विभागाने सखोल प्रकल्प अहवालाचा ४०% खर्च सोसण्यास सहमती दर्शविली आहे.

८.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९५७ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे अंधेरी-घाटकोपर मार्गावर सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्थेसाठी सखोल प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी रु.३५ लाख अधिक सेवाकर इतक्या फी वर दिल्ली मेट्रो रेल महामंडळाची सोल सोअर्स बेसिसवर नेमणूक करण्यास कार्योत्तर मंजूरी देत आहे."

**बाब क्र.९ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प - छत्रपती शिवाजी विमानतळ, डोमेस्टिक टर्मिनल येथे पश्चिम द्रुतगती महामार्गावर उड्डाणपूलाच्या उभारणीकरीता संकल्पचित्र तयार करण्याकरीता व प्रकल्प व्यवस्थापनाकरीता मेसर्स डार कन्सल्टंटस् यांची महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे नेमणूक करण्याबाबत.**

९.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेतला आहे. दिनांक ६ ऑगस्ट, २००४ रोजी झालेल्या २०८ व्या बैठकीत कार्यकारी समितीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ९ उड्डाणपुलांच्या उभारणीकरीता प्रकल्प अंमलबजावणी संस्था म्हणून नेमणूक करण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास त्या त्या रस्त्यांच्या उभारणीकरीता प्राधिकरणाने नेमणूक केलेल्या संकल्पचित्र व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या सेवांचा वापर करुन घेण्यास सांगण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी विमानतळ, डोमेस्टिक टर्मिनल येथे पश्चिम द्रुतगती महामार्गावर उड्डाणपूलाचे महत्व लक्षात घेता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने

सदर उड्डाणपूल हा विशेषरित्या संस्मरणीय उड्डाणपूल (Signature Bridge) म्हणून उभारण्याचे प्रस्तावित केले आहे. मेसर्स डार कन्सल्टंट्स, यू.के. यांचा अशाप्रकारचे बांधकाम करण्याचा पूर्वानुभव लक्षात घेता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने या उड्डाणपुलासाठी संकल्पचित्र तयार करण्यासाठी व प्रकल्प व्यवस्थापनासाठी मेसर्स डार कन्सल्टंट्स यांच्याकडून प्रस्ताव मागविला असता मेसर्स डार कन्सल्टंट्स यांनी एकुण बांधकाम खर्चाच्या ५.५०% अधिक सेवाकर एवढया शुल्काचा प्रस्ताव सादर केला आहे. जे.जे.उड्डाणपूल, वांद्रे-वरळी समुद्रसेतू व पुणे येथील उड्डाणपूल यांच्यासारख्या विशेष बांधकामासाठी मेसर्स डार कन्सल्टंट्स, यू.के. यांना एकूण प्रकल्प खर्चाच्या ६% एवढे शुल्क दिले आहे. वरील बाब कार्यकारी समितीच्या दिनांक २४ डिसेंबर, २००४ रोजी झालेल्या २१० व्या बैठकीत मंजूरीसाठी सादर केली होती. परंतू मेसर्स डार कन्सल्टंट्स यांची सोल सोअर्स बेसीसवर नेमणूक करण्याऐवजी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात तसेच निविदाकारांना प्रस्तावित उड्डाणपूलाचे संकल्पचित्र तयार करुन निविदेबरोबरच सादर करण्यास सांगावे जेणेकरुन उत्कृष्ट दर्जाच्या संकल्पचित्राची निवड करता येईल अशी सूचना कार्यकारी समितीने केली. त्यानंतर, यासंबंधात व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी कळविले की, निविदा प्रक्रियेमध्ये अंदाजे ३ ते ६ महिन्याचा कालावधी लागेल. त्यामुळे पावसाळयापूर्वी उपलब्ध असलेला कामाचा वेळ वाया जाऊन प्रकल्प पूर्ण होण्यास उशीर होईल. तसेच मा.केंद्रीय राज्यमंत्री, नागरी हवाई वाहतूक यांचेकडूनही सदर प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी पाठपूरावा होत आहे. या स्पष्टीकरणाच्या आधारे ही बाब कार्यकारी समितीच्या विचारार्थ पुन्हा सादर करण्यात आली आहे.

९.२ यासंबंधात चर्चा केल्यानंतर कार्यकारी समितीने असे ठरविले की, मेसर्स डार कन्सल्टंट्स यांना बांधकाम खर्चाच्या ५.५०% अधिक सेवाकर इतकी फी न देता, इतर सल्लागारांप्रमाणेच ३.५% अधिक सेवाकर इतकी फी मेसर्स डार कन्सल्टंट्स यांना मान्य असल्यास त्यांची संकल्पचित्र तयार करण्याकरीता व प्रकल्प व्यवस्थापनाकरीता सोल सोअर्स बेसीसवर नेमणूक करण्यात यावी. अन्यथा कार्यकारी समितीने मंजूर केलेल्या सल्लागारांच्या संक्षिप्त यादीतून विहित फी वर अन्य सल्लागाराची नेमणूक करण्यात यावी.

**<u>बाब क्र.१०</u> : <u>प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल – दिनांक १६ डिसेंबर, २००४ ते दिनांक २८ फेब्रुवारी, २००५.</u>**

दिनांक १६ डिसेंबर, २००४ ते दिनांक २८ फेब्रुवारी, २००५ पर्यंतच्या प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>बाब क्र.११</u> : <u>दिनांक ३१ डिसेंबर, २००४ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.</u>**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २००४ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>बाब क्र.१२अ)</u> : <u>मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : तिमाही व्यवस्थापन अहवाल – दिनांक १ जुलै, २००४ ते दिनांक ३० सप्टेंबर, २००४.</u>**

**<u>बाब क्र.१२ब)</u> : <u>मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : तिमाही व्यवस्थापन अहवाल – दिनांक १ ऑक्टोबर, २००४ ते दिनांक ३१ डिसेंबर, २००४.</u>**

मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधीच्या दिनांक १ जुलै, २००४ ते ३० सप्टेंबर, २००४ व दिनांक १ ऑक्टोबर, २००४ ते दिनांक ३१ डिसेंबर, २००४ पर्यंतच्या अहवालांची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>बाब क्र.१३</u> : <u>मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाची माहिती सर्वसामान्य नागरिक व प्रकल्पग्रस्तांपर्यंत प्रभाविरित्या पोहचविण्याकरीता जनसंपर्क सल्लागार संस्थेची नियुक्ती करणे.</u>**

१३.१ या बाब टिप्पणीबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पातील रेल्वे व रस्ते घटकांमुळे बाधित होणा-या सुमारे २३,००० कुटुंबांचे पुनर्वसन राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या धोरणानुसार प्राधिकरण करीत आहे. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाची माहिती सर्वसामान्य नागरिकांना प्राप्त व्हावी, प्रकल्पबाधित लोकांना त्यांच्या

पुनर्वसनासंबंधीची माहिती त्वरीत मिळावी तसेच त्यांच्या विविध प्रश्नांचे व समस्यांचे निराकरण व्हावे या दृष्टीने जागतिक बँकेने मिरचंदानी या कम्युनिकेशन स्पेशालिस्टद्वारे मुंबईतील नामवंत जनसंपर्क संस्थांचा अभ्यास केला आणि ११ संस्थांची यादी तयार केली. या ११ संस्थांच्या यादीपैकी ६ संस्थांकडून विनंती प्रस्ताव (RFP) मागविण्याची शिफारस जागतिक बँकेने केली. या जनसंपर्क सल्लागार संस्थेच्या नियुक्तीचा प्रस्ताव निश्चित रक्कमेवर (Fixed Budget) आधारित आहे. त्यानुसार जनसंपर्क सल्लागार संस्थेच्या नियुक्तीचा एका वर्षाचा खर्च सेवाकरासह रु.३९.६७ लाख इतका आहे. सुरुवातीस हा खर्च प्राधिकरणाकडून करण्यात येणार असून या खर्चाची प्रतिपूर्ती जागतिक बँकेकडून प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र शासनास कर्जरुपाने करण्यात येणार आहे. या प्रकल्पात रेल्वे घटकांच्या प्रकल्पग्रस्तांचे मोठया प्रमाणात पुनर्वसन करावयाचे असल्याने मुंबई रेल्वे विकास महामंडळास जनसंपर्क सल्लागार संस्थेद्वारे करावयाच्या कार्यामध्ये सहभागी करुन घेण्यात येईल व या जनसंपर्क सल्लागार संस्थेवरील खर्च प्रकल्प खर्चाच्या प्रमाणात मुंबई रेल्वे विकास महामंडळाकडून वसूल करण्यात येईल. जागतिक बँकेने जनसंपर्क सल्लागार संस्थेची नियुक्ती त्वरीत करण्याबाबत आग्रह धरला आहे. जनसंपर्क सल्लागार संस्थेच्या नियुक्तीकरीता विचारार्थ विषयांना (TOR) जागतिक बँकेने मान्यता दिल्यानंतर, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, या ६ जनसंपर्क सल्लागार संस्थांना प्रस्तावाचे विनंती अर्ज (RFP) पाठविण्यात आले. त्यापैकी ४ जनसंपर्क सल्लागार संस्थांनी प्रस्तावाचे विनंती अर्ज सादर केले. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या विनंती अर्जांची छाननी / तांत्रिक व वित्तीय प्रस्तावांचे मूल्यमापन एका समितीद्वारे करण्यात आले. या समितीने केलेल्या मूल्यमापनानुसार मे.क्लिया पब्लिक रिलेशन प्रा.लि. यांना सर्वात जास्त गुण मिळाले आहेत. या संस्थेच्या नेमणूकीचा खर्च १,००,०००/- अमेरिकन डॉलरपेक्षा कमी असल्याने सदर प्रस्तावास जागतिक बँकेच्या पूर्वमंजूरीची आवश्यकता नाही. तथापि, सदर प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीसाठी जागतिक बँकेस सादर करण्यात येईल. जागतिक बँकेने सूचित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली असल्याने जागतिक बँकेच्या कार्योत्तर मंजूरीच्या अधिन राहून मे.क्लिया पब्लिक रिलेशन प्रा.लि. या संस्थेची एक वर्षाच्या कालावधीसाठी जनसंपर्क सल्लागार संस्था म्हणून नियुक्ती करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

१३.२ यासंबंधात श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सूचना केली की, मे.क्लिया पब्लिक रिलेशन प्रा.लि. या संस्थेची नेमणूक झाल्यानंतर त्यांनी करावयाच्या कामासंबंधी त्यांनी सादरीकरण करावे. या सूचनेस कार्यकारी समितीने मान्यता दिली.

१३.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९५८ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाची माहिती अधिकाधिक प्रभावीरित्या सर्वसामान्य नागरिक व प्रकल्पग्रस्तांपर्यंत पोहचविण्याकरीता जनसंपर्क सल्लागार संस्था म्हणून मे.क्लिया पब्लिक रिलेशन प्रा.लि. यांची, जागतिक बँकेच्या मान्यतेच्या अधीन राहून, सर्व करांसह रु.३९,६७,०००/- (रुपये एकोणचाळीस लाख सदुसष्ट हजार मात्र) इतक्या फी वर एक वर्षाच्या कालावधीकरीता नेमणूक करण्यास मान्यता देत आहे. सुरुवातीस हा खर्च प्राधिकरणाच्या निधीतून कार्यपध्दतीनुसार करण्यात यावा व नंतर या खर्चाची प्रतिपूर्ती प्रकल्पांतर्गत व करारनाम्यानुसार करण्यात यावी, तसेच सदर खर्च प्रकल्प खर्चाच्या प्रमाणात मुंबई रेल्वे विकास महामंडळाकडून वसूल करण्यात यावा.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१४ :** **मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्प - वर्ग 'क' मधील कामांसाठी सर्वंकष व अभियांत्रिकी आराखडे तयार करण्यासाठी व प्रकल्प व्यवस्थापनासाठी सल्लागारांची नवीन संक्षिप्त सुची करणे.**

१४.१ या बाब टिप्पणीबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची कामे प्राधिकरणातर्फे हाती घेण्यात आली आहेत. या प्रकल्पाच्या बृहत आराखडयामधील प्रकल्पांचे ३ प्रकारात वर्गीकरण करण्यात आले आहे - (अ) रस्त्यांच्या जाळयांची सुधारणा करणे, अस्तित्वात नसलेले जोडरस्ते बांधणे व विविध वाहतूक नियंत्रणाचे उपाय योजणे, (ब) सर्वसाधारण उड्डाणपूल, रस्ते / रेल्वेवरील पादचारी ओलांडणी पूल व रस्त्याखालील ओलांडणी मार्ग, व (क) जास्त लांबीचे उड्डाणपूल, उन्नत रस्ते व इतर गुंतागुंतीची कामे. यामधील निवडक कामांची संकल्पचित्रे, स्पेसिफिकेशन, अंदाजपत्रके तसेच निविदा संच तयार करणे इत्यादीसाठी सर्व संबंधित सार्वजनिक उपक्रमांच्या कार्यालयांच्या सल्ल्यानुसार ४० सल्लागारांची एक विस्तृत यादी करण्यात आली व या सल्लागारांकडून डिसेंबर, २००२ मध्ये स्वारस्य प्रस्ताव मागविण्यात आले. या सल्लागारांच्या प्रस्तावांची वैधता डिसेंबर, २००३ पर्यंत होती, ती डिसेंबर, २००५ पर्यंत वाढविण्यास कार्यकारी समितीने दिनांक २४ डिसेंबर, २००४ रोजी झालेल्या २१० व्या बैठकीत मान्यता दिली आहे. महानगर आयुक्तांनी पुढे असेही सांगितले की, वर्ग 'क' मध्ये पूर्व मुक्त मार्ग (म्युझियम ते पूर्व द्रुतगती मार्ग), गोरेगांव-मुलूंड जोडरस्त्यावरील पाईप लाईन रस्ता, सहार रस्त्यावरील उन्नत रस्ता (पश्चिम द्रुतगती मार्ग ते छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ) व जुहू विमानतळाखालील बोगदा या कामांचा समावेश असून या कामांसाठी मे.कन्सल्टिंग इंजिनिअरींग सर्व्हिसेस, मेसर्स डार कन्सल्टंट्स, मेसर्स डॉर्श कन्सल्टंट्स, मे.पेल फ्रीशमन कन्सल्टंट्स, मे.स्टूप कन्सल्टंट्स व मे.विल्बर स्मिथ असोसिएट्स या सल्लागारांना कार्यकारी समितीने यापूर्वी पात्र ठरविले आहे. या सल्लागारांकडून मागविलेल्या प्रस्तावांचे मूल्यमापन करण्यासाठी एक तांत्रिक मूल्यमापन समिती स्थापन केली होती. 'क' वर्गातील वरील ४ प्रकल्पांपैकी पूर्व मुक्त मार्ग व सहार रस्त्यावरील उन्नत रस्ता ही कामे पात्र सल्लागारांना यापूर्वीच देण्यात आली आहेत. उर्वरित दोन कामांचा अंदाजित खर्च सुमारे रु.१८५ कोटी इतका आहे. मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या प्राधान्य क्रमांक-१ मधील एकूण रु.१९८० कोटींच्या कामांपैकी प्राधिकरणाने करावयाच्या कामांचा अंदाजित खर्च सुमारे रु.१००० कोटी इतका आहे. प्राधिकरणाने आतापर्यंत सुमारे रु.१०५० कोटीची कामे हाती घेतली असून त्यामध्ये Megacity व

ASIDE अंतर्गत करावयाच्या कामांचाही समावेश आहे. कार्यकारी समितीने / प्राधिकरणाने मंजूर केलेल्या रु.१००० कोटी पेक्षा जास्त झालेल्या खर्चाच्या मान्यतेसाठीचा प्रस्ताव कार्यकारी समिती व प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करण्यात येईल तसेच उपलब्ध असलेला निधी व प्राधिकरणाकडून घेण्यात आलेले प्रकल्प यांची माहितीही सादर करण्यात येईल. महानगर आयुक्तांनी पुढे असेही सांगितले की, 'क' वर्गातील कामांपैकी गोरेगांव-मुलूंड रस्त्यावरील पाईप लाईनच्या कामामधील पर्यावरणसंबंधी बाबींचा तसेच गुंतागुंतीच्या संकल्पचित्राचा विचार करता आणि जुहू विमानतळाखालील बोगद्याच्या कामामधील सुरक्षिततेचा विचार करता, तांत्रिक समितीने सल्लागारांकडून नवीन प्रस्ताव मागविण्याचा सल्ला दिला आहे. मध्यंतरीच्या काळात पूर्वीच्या पात्र सल्लागारांव्यतिरिक्त इतर आंतरराष्ट्रीय सल्लागारांनी या प्रकल्पामध्ये स्वारस्य दाखविले आहे. मात्र कार्यकारी समितीने यापूर्वी मंजूर केलेल्या फी नुसार काम करण्यास आंतरराष्ट्रीय सल्लागारांनी असमर्थता व्यक्त केली आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता बाब टिप्पणीच्या जोडपत्र-१ मध्ये नमूद केलेल्या १३ सल्लागारांची नवीन संक्षिप्त यादी करुन त्यांचेकडून तांत्रिक व आर्थिक प्रस्ताव मागविण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. या यादीमध्ये डिसेंबर, २००५ पर्यंत वैध असलेल्या पूर्वीच्या यादीतील सल्लागारांचाही समावेश आहे. ही संक्षिप्त यादी डिसेंबर, २००५ पर्यंत वैध राहील.

**१४.२** श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी असे सांगितले की, पूर्वीच्या यादीतील मे.स्टूप कन्सल्टंट्स यांचा प्रस्तावित नवीन संक्षिप्त यादीमध्ये समावेश केला आहे कारण त्यांना आतापर्यंत फक्त एकच काम देण्यात आले आहे व नवीन काम स्वीकारण्यात त्यांनी स्वारस्य दाखविले आहे.

**१४.३** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९५९** :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (दोन) व (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या वर्ग-क मधील कामांसाठी सोबत जोडलेल्या जोडपत्रामध्ये नमूद केलेल्या १३ सल्लागारांच्या संक्षिप्त सूचीस मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील जोडपत्रामध्ये नमूद केलेल्या सल्लागारांकडून वर्ग 'क' अंतर्गत व अशात-हेच्या इतर कामांसाठी तांत्रिक व आर्थिक प्रस्ताव मागविण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>पटल बाब</u> : <u>मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या कामाकरीता तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्याबाबत.</u>**

या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पामुळे बाधित होणा-या सुमारे २३,००० कुटुंबांचे/दुकानांचे पुनर्वसन प्राधिकरणाने हाती घेतले आहे. या कामी स्पार्क (SPARC), स्लम रिहॅबिलीटेशन सोसायटी (SRS) या दोन अशासकीय संस्थांची मदत घेण्यात येत आहे. पुनर्वसन व पुनर्वसाहत अंमलबजावणीच्या कामात जास्तीत जास्त सुधारणा करण्यासंबंधात जागतिक बँक आग्रही आहे. पुनर्वसन व पुनर्वसाहत कामावर देखरेख, संनियंत्रण तसेच प्रकल्पबाधित लोक, अशासकीय संस्था व इतर संलग्न संस्था यांच्याशी समन्वय साधण्यासाठी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करावी अशी जागतिक बँकेने सूचना केली आहे. अशा सल्लागाराच्या नियुक्तीसाठी तयार केलेल्या विचारार्थ विषयांना (TOR) जागतिक बँकेने मान्यता दिली आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, मे. इकोस्मार्ट इंडिया लिमिटेड या सल्लागार संस्थेस पुनर्वसन व पुनर्वसाहत संबंधीच्या कामाची माहिती आहे. तसेच या संस्थेने जागतिक बँकेबरोबर अशा प्रकारचे काम केलेले आहे. मे. इकोस्मार्ट इंडिया लिमिटेड ही संस्था आय. एल. एफ. एस. या संस्थेशी संलग्न असलेली कंपनी आहे. या संस्थेने यापूर्वी सुमारे ५,००० प्रकल्पबाधित कुटुंबांचे पुनर्वसन व पुनर्वसाहत संबंधीत काम केलेले आहे. तसेच यापूर्वी प्राधिकरणाच्या मुंबई नागरी परिवहन प्रकल्प संबंधीत कामासाठी त्यांची नेमणूक करण्यात आली होती. सुरुवातीला सल्लागार संस्थेचा कार्यकाळ सहा महिने राहील व आवश्यकतेनुसार कार्यकाळ आणखी सहा महिन्यांकरीता वाढविण्यात येईल. सल्लागार संस्थेद्वारे पहिल्या सहा महिन्याच्या कामाची फी म्हणून, सर्व खर्च व करांसह, एकुण रु.३५ लाख व पुढील सहा महिन्यांकरीता एकूण रु.२५ लाख फी म्हणून आकारले जातील. यासंबंधात सल्लागार

संस्थेशी वाटाघाटी केल्यानंतर प्रत्यक्ष फी ची रक्कम निश्चित करता येईल. सुरुवातीला हा खर्च प्राधिकरणातर्फे करण्यात येईल व त्याची प्रतिपूर्ती जागतिक बँकेकडून कर्जाच्या स्वरुपात करण्यात येईल. सल्लागारांना कार्यालयीन जागा व कामाशी निगडीत इतर सुविधा प्राधिकरणातर्फे पुरविण्यात येतील. या सल्लागार संस्थेने करावयाच्या कामाच्या विचारार्थ विषयांना (TOR) तसेच हे काम करण्यासाठी मे. इकोस्मार्ट इंडिया लिमिटेड यांनी तत्वतः सहमती दर्शविली असून त्यांचा प्रस्ताव औपचारिकपणे लवकरच प्राप्त होईल. जागतिक बँकेच्या मान्यतेच्या अधिन राहून मे. इकोस्मार्ट इंडिया लिमिटेड या सल्लागार संस्थेची सोल सोअर्स बेसीसवर नेमणूक करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९६०</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहत कार्यासाठी सल्लागार म्हणून सुरुवातीला सहा महिन्यांसाठी व आवश्यकतेनुसार पुढील सहा महिन्यांसाठी जास्तीत जास्त एकूण रु.६० लाख (सर्व खर्च व सेवाकरासह) इतक्या फी वर मे. इकोस्मार्ट इंडिया लिमिटेड या तज्ञ सल्लागाराची सोल सोअर्स बेसीसवर तसेच जागतिक बँकेच्या मान्यतेच्या अधिन राहून नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** या सल्लागारांशी वाटाघाटी करण्यास व या ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

—— oooooooooo ——

**जोडपत्र...**

जोडपत्र

## Short-list of Consultants for inviting proposals

1. Dar Consultants, U.K.
2. STUP Consultants, Mumbai.
3. Dewey Ballantine, London, U.K.
4. Flames Consulting (I) Pvt. Ltd., (Sete), France
5. T.Y.Lin International, U.S.A.
6. Louis Berger, New Delhi
7. Scott Wilson Kirkatrick India Pvt. Ltd.
8. High Pointy Rendel, U.K.
9. Maunsell Harris, Consulting Engg. Pvt. Ltd., New Delhi
10. Sheladdia Associates India
11. Geo Desic Techiques Pvt. Ltd., J.V.PJSI Consultants Malaysia
12. Amberg & TTI, Australia
13. Anwikar Associates, Germany

*********